महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

---

जा.क्रं./ प्रेस नोट / 205 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 22 / 05 / 2025

---

# 1)खुनाचा प्रयत्न :–

**मुदखेड :–** दिनांक 20.05.2025 रोजी 09.00 वा. चे सुमारास **मौ. चिलपिंपरी फिर्यादीचे घरासमोर ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.नागोराव माधवराव गाढे, व इतर सहा आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवून संगणमत करून हातात लोखंडी रॉड व कुऱ्हाड घेवुन येवून फिर्यादीस शेतीच्या जुन्या वादावरून डोक्यात मारून गंभीर दुखापत केली. व यातील साक्षीदार नामे सिताराम,नागोराव येडे, यांचे डोक्यात मारहाण करून गंभीर दुखापत केली.तसेच महिला साक्षीदार भारतबाई येडे हिस लाथाबुक्यानी मारहाण करून लोखंडी रॉडने मारून डोक्यात गंभीर दुखापत करून जखमी करून खुन करण्याचा प्रयत्न केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी बालाजी देविदास येडे, वय 34 वर्षे, व्यवसाय शेती रा. चिंलपिंपरी ता. मुदखेड जि. नांदेड** यांचे फिर्यादीवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 87 / 2025 कलम 109, 118(2),118(1),189(2),191(2),191(3),190,352,351(3) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/ सप्रे, मो. नं. 8425840431** हे करीत आहेत.

# 2)आत्महत्येस प्रवृत्त केले :–

**हदगाव :–**दिनांक 19.05.2025 रोजी 15.00 वा. चे सुमारास **फिर्यादीचे राहते घरी आय.टि.आय.च्या मागे हदगाव ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील मयत नामे शेख सानिया शेख अहमद, वय 19 वर्षे, रा. हदगाव ता. हदगाव जि. नांदेड हिने यातील आरोपी नामे आर्शियन शफी पठाण, वय 22 वर्षे, रा.पुसद जि.यवतमाळ हा यातील मयतास तुला माझेसोबत लग्न करायचे असेल तर तुला नौकरी सोडून दयावी लागेल शिक्षण सोडून दे मला विचारले शिवाय बाहेर जायचे नाही कोणास बोलायचे नाही माझे ऐकले नाही तर मी तुझ्या सोबत लग्न करणार नाही. अश्या धमक्या देवुन मानसिक त्रास दिल्याने मयत हिने गळफास घेवून आत्महत्या केली. तिस नमुद आरोपीने आत्महत्येस प्रवृत्त केले. वगैरे **फिर्यादी शेख अहमद शेख सरदार, वय 50 वर्षे, व्यवसाय मिस्त्रीकाम रा. आय.टि.आय.च्या मागे हदगाव ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं 158 / 2024 कलम 108 भारतीय न्याय संहिता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि / रायबोले, मो. नं.7020433476** हे करीत आहेत.

# 3)जबरी चोरी :–

**लोहा :–**दिनांक 20.05.2025 रोजी 22.45 वा. चे सुमारास **शिवाजी चौक लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1. शुभम साहेबराव नागेश्वर, व इतर दोन आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीस अज्ञात कारणावरून मारहाण करून फिर्यादीचे गळयातील सोन्याची चैन 60,000 /–रूपये जबरीने काढून नेले. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी हरीओम यशवंत बनसोडे, वय 20 वर्षे, व्यवसाय व्यापार रा.शिवाजी चौक,ता.लोहा जि.नांदेड** यांचे फिर्यादीवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 142 / 2025 कलम 119(1),115,351(2),3(5) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि / पांचाळ, मो.नं. 9423437844** हे करीत आहेत.

# 4)गंभीर दुखापत :–

**माहुर :–** दिनांक 19.05.2025 रोजी 18.30 वा. चे सुमारास **मौ.जगुनाईक तांडा फिर्यादीचे घरासमोर ता.माहुर जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.राजु रामधन राठोड, वय 34 वर्षे, 2.गजानन रामधन राठोड, वय 36 वर्षे,3.रामधन भोजु राठोड,वय 55 वर्षे,सर्व रा.जगुनाईक तांडा ता.माहुर जि. नांदेड आरोपीतांनी संगनमत करून यातील फिर्यादीस जुन्या भांडणाचे कारणावरून शिवीगाळ करून लाथाबुक्यानी मारहाण करून डोक्यास व उजव्या हातास गंभीर दुखापत केली. व जिवे मारण्याची धमकी दिली.वगैरे **फिर्यादी अजय सुभाष पवार, वय 20 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. जगुनाईक तांडा ता.माहुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे माहुर** गुरनं 67 / 2025 कलम 118(2),117(2)(3)(4),115(2),352,351(1)(2), 3(5) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि / अन्येबोईनवाड मो.नं. 9011149597** हे करीत आहेत.

## 5)कोप्टा ॲक्ट :–

**तामसा :–** दिनांक 21.05.2025 रोजी 11.00 वा. चे सुमारास **तामसा ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपी नामे नंदु दिगंभर महाजन, वय 25 वर्षे रा. तामसा याने स्वतःचे आर्थीक फायदयासाठी बिना परवाना बेकायदेशिररित्या शासनाने प्रतिबंधीत केलेला तंबाखुजन्य विविध कंपनीचे सिगारेट किंमती 3712/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/847, गायकवाड, ने. पोस्टे तामसा** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे तामसा** गुरनं 93/2025 कलम 6(अ), 24 कोप्टा कायदा 2003 प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/611 पवार, मो.क्र. 8208810448** हे करीत आहेत.

## 6)जुगार :–

**1)अर्धापुर :–** दिनांक 21.05.2025 रोजी 15.00 वा. चे सुमारास **आठवडी बाजार सरकारी दवाखाना पाठीमागे मोकळया जागेत अर्धापुर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.पुरूषोतम पांडूरंग कानोडे, वय 24 वर्षे, व्यवसाय मजुरी 2.विलास शिवाजी शेटे,वय 42 वर्षे, दोघे, रा. अर्धापुर हे विना परवाना बेकायदेशिररित्या वरली नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना जुगाराचे साहित्य व नगदी 2070/–रू चे मुद्देमालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/2836 विवेक भगवानराव रावते, ने. उपविभागीय पो.अ.कार्यालय नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे अर्धापुर गुरनं 306/2025 कलम** 12(अ) म जु का प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/2353 बोदेमवाड, मो. नं. 9022978909** हे करीत आहेत.

**2)लोहा :–** दिनांक 21.05.2025 रोजी 16.25 वा. चे सुमारास **नांदेड ते लोहा जाणारे रोडलगत मोकळया जागेत लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे दत्ता चांगोजी फुलपगार, वय 34 वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. लिंबोनी नगर लोहा हा विना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना जुगाराचे साहित्य व नगदी 2050/–रू चे मुद्देमालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/989 रविद्र राधाकृष्ण कचरे, ने. उपविभागीय पो.अ.कार्यालय कंधार** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे लोहा गुरनं 144/2025 कलम** 12(अ) म जु का प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/2127 लाडेकर, मो. नं. 9823305906** हे करीत आहेत.

**3)उमरी :–** दिनांक 21.05.2025 रोजी 19.15 वा. चे सुमारास **मच्छी मार्केट सार्वजनिक रोडवर उमरी ता.उमरी जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे रामा विठ्ठल वच्छेवार, वय 65 वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. पहाड गल्ली उमरी हा विना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना जुगाराचे साहित्य व नगदी 2600/–रूपयाचे मुद्देमालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/3224 लक्ष्मण जकोजी कल्याणकर, ने. उपविभागीय पो. अ.कार्यालय धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे उमरी गुरनं 164/2025 कलम** 12(अ) म जु का प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **सपोउपनि/कदम, मो. नं. 9623658510** हे करीत आहेत.

## 7)प्रोव्हिबिशन :–

**धर्माबाद :–** दिनांक 21.05.2025 रोजी 18.00 वा. चे सुमारास **सायखेड फाटयाजवळ साई धाब्यावर ता.धर्माबाद जि. नांदेड येथे** यातील आरोपी नामे सतिष लक्ष्मण इंगळे, वय 23 वर्षे, व्यवसाय धाबा चालक रा.जारीकोट हा विना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारू किंमती 3030/–रूपयाची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने आपले ताब्यात बाळगलेला मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/667 शिवराज संभाजी गांगुलवार, ने. पोस्टे धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 133/2025 कलम 65(ई), म. प्रो. का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1135 संगेवार, मो.नं. 9021961607** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड